**Review Of Research**
Vol.2,Issue.1 ,Oct; 12pp.1-4
**ISSN:-2249-894X**

Available online at www.reviewofresearch.net

RESEARCH PAPER

# प्रतापगडाचे युद्ध आणि अफजलखानाचा वध

*अनिल माणिकराव बैसाणे*

*झेड् बी. पाटील कॉलेज, देवपूर, धुळे*

**सारांश :-**

शिवरायांच्या जावळीवरील विजयामुळे रायगड, चंद्रगड, मकरंदगड, सोनगड हे किल्ले व पूर्ण जावळीचा प्रदेश स्वराज्यात आल्याने महाराजांच्या जहागिरीला राज्याचे स्वरूप प्राप्त झाले. कारण दुप्पटीची प्रादेशीक वाढ होऊन स्वराज्याच्या सीमा समुद्रापर्यंत जाऊन भिडल्यात. प्रचंड संपत्तीची प्राप्ती होऊन नवीन गड बांधणी व लष्कर उभारणीस प्रारंभ झाला.

## प्रस्तावना :

कोंडेनळी, ढवळा, सापळखिंड, पारघाट सारखे कोकणातील लष्करीदृष्ट्या महत्त्वपूर्ण घाट महाराजांच्या ताब्यात आलेत. यावेळेपर्यंत महाराजांच्या स्वराज्याची सीमा कोकणात माहुलीपासून ते महाडपर्यंत तर उत्तरेला घोडनदीपासून ते दक्षिणेस सातान्यापर्यंत भिडल्या होत्या. चाळीस लहान–मोठ्या गडकिल्ल्यांसह 10 हजार घोडदळ सेनापती नेताजी पालकरांच्या नेतृत्वात तर येसाजी कंक यांच्या नेतृत्वात 10 हजार पायदळ सज्ज झाले होते आणि मोरोपंत पिंगळेंसारखा कुशल मुख्य प्रधान लाभला होता. कोंडाणा, प्रबळगड, त्रिकोणा हे किल्लेही जिंकून घेतलेत. महत्त्वाचे म्हणजे जावळीजवळच्या भोरप्या डोंगरावर महाराजांनी एक नवा गड बांधला हाच प्रतापगड होय.

## प्रतापगडाचे अजिंक्यत्व :

यामुळे महाबळेश्वर ते रायगड मार्गावर एक मजबूत किल्ला सन 1656 ते 1658 अशा अवघ्या दोन वर्षातच अस्तित्वात आला. अफजलखानासारख्या विजापूरी बलाढ्य सरदारास याच गडाच्या पायथ्याशी ठार करून केलेल्या प्रतापावरून गडास दिलेले प्रतापगड हे नाव सार्थक असल्याचे दाखवून दिले. सन 1689 चा अपवाद सोडल्यास पेशवाईच्या अस्तापर्यंत शत्रूस एकदाही प्रतापगड जिंकता आला नाही.[1]

## अफजलखानाचा वध :

स्वराज्य आणि शिवरायांवरील पहिले मोठे संकट म्हणजे अफलखानाची स्वारी होय. मराठ्यांच्या इतिहासातील हा प्रसंग अत्यंत महत्त्वाचा होता. कारण या स्वारीमुळे शिवरायांचे जर बरे–वाईट झाले असते तर महाराष्ट्र राज्य आणि संस्कृती नामशेष झाली असती. आपल्याला म्हणजेच महाराष्ट्राला आणि मराठ्यांना इतिहासच राहिला नसता. स्वराज्य हे फक्त स्वप्नच राहिले असते. म्हणूनच या प्रसंगातून शिवरायांनी स्वतःबरोबरच महाराष्ट्र आणि मराठी स्वराज्यालाच नवा जन्म मिळवून दिला.

सन 1656 मध्ये महमंद शाह या आदिलशाही सुलतानाचा मृत्यू झाल्याने बेगम बडीसाहिबाने अलि आदिलशहास गादीवर बसवून सत्ता सूत्रे स्वतःच्या हाती घेतली. शिवरायांचा बंदोबस्त करण्यासाठी अफजल (अव्वल दर्जाचा) सेनानीची नियुक्ती करून शिवरायांना ठार करण्याकरीता पाठविले. अफजल खान तुळजापूर व पंढरपूर या तीर्थस्थळांना उपसर्ग पोहचवत स्वराज्यात आला. महाराजांनी राजगडावरून जिजाऊंचा निरोप घेऊन प्रतापगडाचा आश्रय घेतला. मोठ्या युक्तीने खानास वागवून भेट प्रतापगडाच्या पायथ्याशी निश्चित केली. 10 नोव्हेंबर 1659 रोजी प्रत्यक्ष दगाबाज अफजलखानाचा वध करून स्वराज्य राखले. या पराक्रमाचे वर्णन करतांना सभासदांनी महाराजांना

भीमाची उपमा देऊन अफजलखान म्हणजेच दुर्योधनास ठार केले.[2] या ठिकाणी शिवरायांच्या पराक्रमावर प्रसन्न होऊन त्यांनी शिवरायांना अवतारी पुरुष संबोधले आहे. या प्रसंगावर भाष्य करतांना सेतू माधवराव पगडे यांनी म्हटले आहे की, '10 नोव्हेंबर 1659 ला खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचे राज्य अस्तित्वात आले.' महाराजंच्या लौकिकात वाढ होऊन खऱ्या अर्थाने स्वतंत्र सत्ता निर्माण झाली.[3]

अफजलखानाचा मृत्यू व त्याच्या सैन्याची कत्तल आणि पिछेहाट म्हणजे विजापूर दरबाराला जबरदस्त धक्काच होता. अफजलखानासारखा बलाढ्य शत्रू नामशेष केल्यावर महाराजांचे स्वराज्य आता भक्कम पायावर उभे आहे हे सिद्ध झाले. आदिलशाही फौजांची धुळधान झाल्याने महाराजांच्या मराठा फौजांनी वाईपर्यंत पाठलाग केला. पुढे कोल्हापूरपर्यंत येवून किल्ले व प्रदेश काबीज केलेत. आदिलशाही ताब्यातील पन्हाळ्यावरही वर्चस्व केले.[4]

### *अफजलखानाचा शिरच्छेद लोककथा :*

अफजलखानाचा अंगरक्षक सय्यद बंडा हा मंत्रविद्या पारंगत असून कापलेले शीर पुन्हा मंत्र बळाने जोडतो. असे होऊ नये म्हणून महाराजांनी धडापासून शीर वेगळे केल्यानंतर आपल्यासोबत गडावर नेले. अशी लोककथा आहे. (अर्थात सय्यद बंडा हा अफजलखानासोबतच ठार झाला होता.) यात कोणतीही ऐतिहासिकता नाही. तर दिनदार कुफ्रशिकन (काफिरांचे निर्दालन करणारा) आणि दिनदार बुतशिकन (मूर्ती विध्वसंक) अशी ख्याती असणाऱ्या घमेंडखोर अव्वल दर्जाच्या सेनानीला ठार करून आदिलशाहीवर जबरदस्त प्रहार करण्याच्या हेतूच्या परिपूर्तीसाठी शीर कलम करून महाराज आणि त्यांचे लढवय्ये अंगरक्षक जिवा महाला आणि संभाजी काऊजी यांनी गडावर आणले. नंतर ते राजगडावर नेऊन जिजाऊंना दाखविण्यात आले (हाच अफजल की ज्याने शहाजी महाराज साहेबांना कब्द करून थोरला बंधू संभाजी यास ठार करविले होते.) आणि नंतर ते राजगडाच्या भिंतीमध्ये गाडण्यात आले. प्रतापगडाच्या पायथ्याशी महाराजांनी अफजलखानाची कबर बांधून त्याठिकाणी दिवाबत्तीची सोय लावली होती. ही कबर म्हणजे साधा चुन्यात बांधलेला ओटा होता. नंतर मात्र निजामाने सन 1895 मध्ये याठिकाणी संगमरवरी दगडाचा वापर करून भव्य छत उभारले. आज हे स्थळ पोलिस संरक्षणात असल्याने कोणासही प्रवेश मिळत नाही. अफजल मेमोरीयल सोसायटीतफे कबरीची देखभाल केली जाते.[5]

### *प्रतापगडाचा इतिहास :*

महाबळेश्वरपासून उत्तरेस व नंतर पश्चिमेस उताराच्या घाट रस्त्याने खाली येऊन 18 कि. मी. वर पारगावपर्यंत गेल्यास तेथून डाव्याबाजून चार ते पाच कि.मी. वर चढून प्रतापगडावर जाता येते. प्रतापगड हा घनदाट काटेरी–झुडुपांनी आणि रानवेलींनी वेढलेला वनदुर्ग आहे. अफजलखानाच्या समाधीपर्यंत जाऊन तेथून थोड्याच अंतरावर गडाच्या पश्चिमबाजूच्या मुख्य प्रवेशद्वारातून गडाच्या आत प्रवेश करता येतो. पारगाव हे प्रतापगडाच्या पायथ्याशी असलेले प्राचीन पवित्र स्थळ मानले जाते. या गावात श्रीरामवरदायिनीचे जागृत देवस्थान आहे. रावणाने अपहरण केलेल्या सीतेचा शोध घेत प्रभू रामचंद्रांनी याठिकाणी येऊन देवीकडून वर मिळविला होता. तेव्हांपासून देवीला श्रीरामवरदायिनी म्हणून संबोधले जाते.[6]

### *गडावरील तुळजाभवानीचे मंदीर :*

महाराज हे भवानी देवीचे निस्सीम भक्त होते. त्याकरिता ते नेहमी तुळजापुराला देवीच्या दर्शनासाठी जात असत. आजही तुळजापुरला भवानी देवीच्या मंदीराच्या मागच्या बाजूला (पश्चिम दिशेला) शिवराय येत असलेल्या रस्त्याचा आणि प्रवेशद्वाराचा निर्देश दाखविलेला आहे. मात्र हे नित्य पूजेकरिता आणि दर्शनाकरिता सोयीची नसल्यामुळे महाराजांनी प्रतापगडावरच भवानी मातेचे मंदीर बांधून मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करवून घेतली. त्याकरिता महाराजांनी नेपाळ नरेश लिलासेन यांच्याकडे मंबाजी पानसरे यांना पाठविले होते. नेपाळमधून गंडकीनदीच्या पात्रातील शिळेपासून देवीची मूर्ती घडवून आणली. राज्यभिषेकाच्या समारंभापूर्वी महाराजंनी देवीला 120 किलो (3 मण) सोन्याचे छत्र अर्पण करून पूजा बांधली होती. पुढे 1929 मध्ये दरोडेखोरांनी दागदागिन्यांसह येथील सोन्याचे छत्र चोरीस नेले.[7]

थोडक्यात पाहिले तर अफजलखान प्रसंग म्हणजे स्वराज्यावरील पहिलेच मोठे संकट होते. यात महाराजांचे जर काही बरे–वाईट झाले असते तर महाराष्ट्र राज्य, संस्कृती आज अस्तित्वात राहिली नसती. याबरोबरच मराठ्यांच्या स्वराज्याचा आणि सामान्य जनतेचा राज्याचा शेवट झाला असता. मात्र शिवरायांनी हे प्रकरण अतिशय धूर्त आणि मुत्सद्दीपणे हाताळून आपल्या अंगभूत अनेक गुणांचे प्रत्यक्ष दर्शनच घडविले. हिंदू धर्माचा, संस्कृतीचा, सामान्य रयतेचा आणि भोसले घराण्याचा पारंपरिक हाडवैरी असलेल्या अफजलखानास ठार करून मराठा स्वराज्याचा अस्मिता राखली.

